# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २३८- २३** **दिनांक : - २९/०७/२०२३**

## नवजात बालकास परित्याग करण्याच्या उददेशाने उघडयावर टाकुन देणाऱ्या वारसांचा शोध घेवुन पिडीतेवर लैगिंक अत्याचार करणा-या आरोपीतास अटक. वालीव पोलिस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २१/०७/२०२३ रोजी सकाळी ०७.०० वा.चे.दरम्यान मितवा चाळीचे पूर्वकडील पहाडीचे पायथ्याशी असलेल्या गवतात, ट्रिनिटी हायस्कुल जवळ वाघराळपाडा वसई पुर्व, येथे नवजात पुरुष जातीचे काही तासापूर्वी जन्माला आलेले बालक मिळुन आल्याने सदर बालकास ग्रामीण रुग्णालय, बोळींज, विरार पश्चिम येथे दवाउपचाराकरीता दाखल करुन त्यास जिवदान देण्यात आले आहे. नवजात बालकाचा संपुर्णता परीत्याग करण्याच्या उददेशाने त्यास उघडयावर टाकुन दिल्याने वालीव पोलीस ठाणेस अज्ञात आरोपीतांविरुध्द गुन्हा नोंद क्र. ६१५/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३१७ प्रमाणे गुन्हा नोद करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा गांभीर व संवेदनशील असल्याने सदर गुन्हा उघडकीस आणणेबाबत वरिष्ठांनी मार्गदर्शन व सुचना दिलेल्या होत्या.सदर सुचनांचे अनुषंगाने वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार तसेच तपासी अधिकारी अतुल नावले यांनी वारसांचा शोध घेण्याकरीता परिसरातील माताबाल संगोपन केन्द्र, प्राथमिक आरोग्य केन्द्र, खाजगी रुग्नालये, आशा सेविका, अंगनवाडी सेवीका व परिसरातील महिला यांचेकडे सखोल तपास करण्यात आला होता. तपासाअंती नवजात बालकास उघडयावर टाकुन दिलेल्या अल्पवयीन पिडीत मुलीचा शोध घेवुन तिस वेळीच वैदयकीय उपचार पुरवुन तिचेवर लैगिंक अत्याचार करणा-या आरोपीतांविरुध्द गुन्हा नोंद क्र. ६३५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७६, ३७६ (२) (एन), ५०६ सह बालकांचे लैगिक अत्याचारा पासुन संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,८,१२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत नामे पंकज रामविनय साहु , वय २४ वर्षे यास १२ तासांत शोध घेवुन मुंबई अमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरुन ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास सदर गुन्हात अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्रीमती पोर्णिमा चौघुले -श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, वसई, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोनि श्री. जिलानी सय्यद (गुन्हे) तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि ज्ञानेश फडतरे, पोउपनि अतुल नावले, पो.हवा. विशाल निंबाळकर, मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अंम.अभिजीत गढरी, विनायक राऊत यांनी केली आहे.

**-----000-----**